सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९९ | शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. कमलेश वानखेडे**
पत्रकार, अमळनेर



**श्री. ब्रह्मवीरसिंग (मौली) कालरा**
इंजिनिअर : टाटा, मुंबई



**श्री. सुजीत सराफ**
अमळनेर



**श्री. प्रसन्ना भांडारकर**
पुणे

## दिनविशेष
११ एप्रिल

- आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना झाली.ळून गेला.
- ॲपल कंपनीने ॲपल I हे कॉम्पुटर तयार झाले.
- चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक भालजी पेंढारकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**आई बापाला विसरू नका; नात्यांची वीण मजबूत ठेवा : वसंत हंकारे**
पान २ वर





अमळनेर : भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागर रथाचे शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता विधिवत पूजा-अर्चा करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष अमळनेरचे प्रांताधिकारी मयूर भंगाळे. शेजारी अमळनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, अमळनेर कृषी विभागाचे मंडल अधिकारी अविनाश खैरनार, उप कृषी अधिकारी योगेश वंजारी, दिनेश पाटील, अमोल कोठावदे तसेच मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, खजिनदार गिरीश कुलकर्णी, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, मंगल सेवेकरी राहुल पाटील आदी. दुसऱ्या छायाचित्रात भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागर रथाला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करताना उद्घाटक विनायक कोते व दत्तात्रय निकम. शेजारी मयूर भंगाळे व अन्य मान्यवर.
(सर्व छायाचित्रे : मयूर चौधरी, नितेश बारी)

## भूमी सुपोषण अभियान चळवळ

# जनजागर रथ विधिवत पूजनानंतर मार्गस्थ

### विविध मान्यवरांची उपस्थिती; आज अमळनेर तालुक्यातील सहा मंडळांतील गावांना भेटीचा करणार प्रारंभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागर रथाचे शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता विधिवत पूजा-अर्चेसह श्रीफळ वाढवून पूजन करण्यात आले. अमळनेरचे प्रांताधिकारी मयूर भंगाळे, अमळनेर उपविभागाचे पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, अमळनेर कृषी विभागाचे मंडल अधिकारी अविनाश खैरनार, उप कृषी अधिकारी योगेश वंजारी, दिनेश पाटील, अमोल कोठावदे तसेच मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, खजिनदार गिरीश कुलकर्णी, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, मंगल सेवेकरी राहुल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा रथपूजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर मुख्य अतिथी प्रांताधिकारी भंगाळे यांनी हिरवा झेंडा दाखवत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत जनजागर रथ मार्गस्थ करण्यात आला. यावेळी *'भूमीमाता की जय', 'मंगलदानी की जय' असा जयघोषही उपस्थितांनी केला.* समाजातील विविध घटकांतील मान्यवर, तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी व मंदिरातील भाविक उपस्थित होते.

या अभियान चळवळीचा जागर उद्या शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ पासून अमळनेर तालुक्यातील सहा मंडळांतील १५६ गावांना भेट देत या रथाच्या माध्यमातून केला जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे बहुमूल्य सहकार्य लाभले असून, ६ मंडळांतील एका प्रमुख गावात अशा एकूण ६ गावांत भूमीमाता पूजनाचा कार्यक्रमही होणार आहे.

सर्वांसाठी जीवनदायिनी असलेल्या भूमीमातेचा चैत्र शुद्ध वर्ष प्रतिपदेला अर्थात गुढीपाडव्याला जन्मदिवस असतो. त्या अनुषंगाने अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ या मंगलदिनी केंद्रीय कृषिमंत्री मा. ना. श्री. शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ श्री मंगळग्रह मंदिरातून करण्यात आलेला आहे. याप्रसंगी गावागावांतून आलेल्या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भूमीमातेचे विधिवत मंगलमय पूजन करण्यात आले. तसेच मंत्री महोदयांनी प. पू. स्वामी नृसिंह विजयेंद्र सरस्वतीजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य श्री. भागैयाजी, अक्षय कृषी परिवाराचे अध्यक्ष मनोजभाई सोलंकी, उपाध्यक्ष डॉ. गजाननजी डांगे, पद्मश्री तथा कृषक शास्त्रज्ञ सुभाषजी शर्मा, महाराष्ट्रातील मंदिर महासंघाचे संयोजक सुनीलजी घनवट, केंद्रीय युवा कल्याण व क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे, जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. गुलाबराव पाटील, राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री मा. ना. श्री. गिरीश महाजन, जळगावच्या खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील व मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांसह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांकडून जैविक शेती उत्पादनाचा संकल्प करवून तशी शपथही त्यांना देवविली. याचवेळी मंत्री श्री. चौहान यांच्यासह विविध महानुभावांनी या राष्ट्रीय अभियानाच्या चळवळीत समाजातील सर्व घटकांनी सहभागी होऊन अन्नदात्या भूमीला आई मानून जैविक शेती करण्याचे आवाहनही यावेळी केले होते. त्याचाच पुढील भाग म्हणून हे अभियान आता गावागावापर्यंत पोहोचविले जाणार आहे.



*जनजागर रथाच्या पूजनानंतर श्रीफळ वाढविताना विविध मान्यवर.*

### आजपासून गावागावांत जनजागर

उद्या, दि. ११ एप्रिल २०२६ पासून भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीचा जनजागर रथ गावागावांत पोहोचणार आहे. यामध्ये अमळनेर तालुक्यातील जनजागर अभियानाची सुरूवात मंगरूळ या गावातून केली जाणार आहे. यावेळी जनजागर रथातून ध्वनिक्षेपकावरून भूमी सुपोषण अभियानाचे महत्त्व, कार्य व भूमी सुपोषण करण्यासंदर्भात सविस्तर माहिती तसेच अन्नदात्या भूमीमातेचे महत्त्व पटवत जैविक शेतीला प्रोत्साहन देणे कसे महत्त्वपूर्ण आहे, हे शेतकरी बांधवांना समजावले जाणार आहे. दिवसभरात साधारणपणे एकूण १० गावांना जनजागर रथ भेट देणार आहे.




**भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीचा गावागावांत जनजागरासाठी सज्ज झालेला रथ.**

### शेतकऱ्यांनो, गतवैभव प्राप्तीसाठी सज्ज व्हा..!

आपला परम पवित्र भारत देश कृषिप्रधान आहे. मात्र, सद्यःस्थितीत देशातील शेती, शेतकरी, शेतमजूर व कृषी उत्पन्न आदींची स्थिती रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा बेसुमार वापर झाल्याने दयनीय झाली आहे. आपल्या पूर्वजांनी पिढ्यानपिढ्या सेंद्रीय व सकस शेती करून त्यात पारंपरिक बियाण्यांचा वापर करून देश समृद्ध ठेवला होता. त्यामुळेच आपल्या मुला-बाळांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहत होते, हे विसरून चालणार नाही. त्यामुळे आपल्या देशातील कृषी क्षेत्राला गतवैभव व निरामयता प्राप्त करून देण्यासाठी विषारी व कुपोषित झालेल्या भूमीमातेला सुपोषित करणे अत्यंत आवश्यक आहे. या राष्ट्रव्यापी अभियानाच्या गंगेत न्हाऊन निघण्यासाठी प्रत्येक गाव-खेड्यांतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत या अभियानाचे महत्त्व वाढवत बळ द्यावे, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांनी केले आहे.

## फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त मोफत तपासणी व थेरपी कॅम्प

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा अमळनेर यांच्या वतीने जनसेवेचा विशेष आरोग्य उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत शरीरातील नर्व्हस सिस्टीम तसेच हाडांशी संबंधित जुन्या आजारांवर विशेष तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत.

कॅम्पमध्ये गुडघेदुखी, कंबरदुखी, मान व खांदे दुखी, सायटिका, ॲसिडिटी तसेच पोटाचे विकार आणि हाडे व नसांशी संबंधित इतर जुन्या आजारांवर उपचार केले जाणार आहेत. विशेष म्हणजे प्रत्येक रुग्णाला सलग सात दिवसांची थेरपी दिली जाणार आहे. या उपचारासाठी नाममात्र ३०० रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे.हा आरोग्य कॅम्प शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार असून सकाळी १० ते दुपारी १ आणि दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत तो सुरू राहील. या कॅम्पसाठी राजस्थान येथील तज्ज्ञ डॉ. दर्शन चौधरी उपस्थित राहून रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत.कॅम्पचे ठिकाण सुरक्षा भवन, तहसील कार्यालय परिसर, जिजाऊ गेटजवळ, संजय टी शेजारी, अमळनेर असून नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



अमळनेर : खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे स्वीय सचिव डॉ. अरुण तांबे यांनी शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी अमळनेर येथील सुप्रसिद्ध श्री मंगळग्रह मंदिराला भेट दिली. या भेटीप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीश कुलकर्णी यांनी डॉ. तांबे यांचा सत्कार केला. यावेळी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपजिल्हाप्रमुख हर्षल पाटील, उल्हासनगर शिवसेनेचे उपशहरप्रमुख सुरेश सोनावणे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. विजय पाटील, नगरसेवक श्रीराम चौधरी व विजय चौधरी आदी.
(छायाचित्र : नितेश बारी)

## संपादकीय

# सागरी सामर्थ्य वाढवाच!

सध्या अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धातून निर्माण झालेली जागतिक अस्थिरता, अशांतता आणि त्याचे भारतावर होत असलेले परिणाम या सगळ्यांचा विचार केल्यास एकूणच भविष्यकाळात भारतासारख्या मोठ्या देशाला आपली सुरक्षितता वाढविणे अत्यंत आवश्यक ठरते. सद्य:स्थितीत भारताला स्वत:चा इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याकरिता बरेच परिश्रम करावे लागत आहेत. होर्मुज या सामुद्रधुनीतून आपली जहाजे सुखरूपपणे बाहेर काढणे भारताला अधिक कष्टदायक होत आहे. भारताच्या तेल व्यापारावर त्याचा मोठा परिणाम झाल्याचे पाहावयास मिळत आहे. कारण आखाती देशांवरही इराणकडून हल्ले झाल्याने भारताला ज्यांच्याकडून हमखासपणे नियमितपणे सुरळीत तेल पुरवठा होतो ते देशही या युद्धाच्या कचाट्यात सापडलेले आहेत. अशा स्थितीत अमेरिका, इराण यांच्याकडून सर्व प्रकारच्या युद्धमाध्यमांचा उपयोग केला जातो आहे. मग अगदी नौदल, पायदळ आणि हवाई दलाच्या माध्यमातून इराण, अमेरिका एकमेकांवर हल्ले करत आहेत. इस्त्रायलकडून क्षेपणास्त्र डागली जात आहेत. कोणत्याही परिस्थितीत इराणमध्ये सत्तांतर घडवून आणणे हा अमेरिकेचा उद्देश आहे. तो कितपत यशस्वी होईल हे येणाऱ्या काळात दिसेल. परंतु अशा परिस्थितीत भारताला जाणवलेली बाब ही अधिक महत्त्वपूर्ण ठरते. कारण अशा परिस्थितीत भारताला जगातील इतर देशांवर अवलंबून राहणे आणि युद्धाच्या परिस्थितीमध्ये स्वत:ची व्यवस्था अबाधित ठेवणे हे सर्वांत मोठे आव्हान ठरते. भविष्यकाळात जागतिक परिस्थिती जरी अशांत झाली तरी सुद्धा भारताला इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार नाही आणि स्वत:ची आत्मनिर्भरताही त्यातून सिद्ध होईल याची तीव्र जाणीव या युद्धाने भारताला करून दिलेली आहे. आपण जगात अनेक मित्र तयार केले असले, तरी त्याचा युद्धजन्य परिस्थितीत कितपत उपयोग होईल हे सांगता येत नाही. म्हणून अशा परिस्थितीत भारताने आपली सर्व प्रकारची शस्त्रसज्जता आणि आत्मनिर्भरता वाढविणे हा त्यावरचा प्रभावी उपाय ठरतो. या सगळ्या उपायांचा एक भाग म्हणून अलीकडेच सरकारने आपली सामरिक शस्त्रसज्जता वाढविण्यावर भर दिलेला आहे.

एकीकडे हे युद्ध सुरू असताना दुसरीकडे भारताने आपल्या नौदलाची प्रहार शक्ती अधिक बळकट केलेली आहे. बॅलेस्टिक क्षेपणास्त्र आयएनएस आरीदमन ही स्वदेशी बनावटीची आण्विक पाणबुडी नौदलाच्या सेवेत दाखल केलेली आहे. भारताचे इतके मोठे नौदल असूनही आतापर्यंत भारताकडे पुरेशा आण्विक पाणबुड्या नव्हत्या. भारताच्या नौदलाच्या सामर्थ्यात या नव्या पाणबुडीने मोठी भर पडलेली आहे. खरेतर यापेक्षाही पाणबुडींची संख्या अधिक असायला हवी. परंतु मधल्या काळात या सगळ्या आण्विक शस्त्र सामर्थ्याकडे दुर्लक्ष झाले होते. सर्वप्रथम २०१६ ला भारतीय नौदलाच्या सेवेमध्ये आयएनएस अरिहंत ही पहिली पाणबुडी दाखल झाली होती. त्यानंतर २०२४ ऑगस्टमध्ये आयएनएस अरिघात ही पाणबुडी विकसित करण्यात आली. परंतु २०१६ ते २०२४ जवळ–जवळ आठ वर्षांनंतर तिसरी पाणबुडी दाखल करणे शक्य झाले. मात्र २०२४ नंतर केवळ दोन वर्षांमध्ये म्हणजेच २०२६ ला आता ही तिसरी अरीदमन आण्विक पाणबुडी दाखल झाल्याने भारतीय नौदलाला मोठा दिलासा मिळाला आहे. किंबहुना भारताच्या नौदल सामर्थ्यांमध्ये मोठी भर पडलेली आहे. या सगळ्या तिन्ही पाणबुड्यांची शृंखला लक्षात घेतली तर प्रत्येकामध्ये अरी हा शब्द आलेला आहे. अरी याचा अर्थ शत्रू होतो. यातून शत्रूला पराभूत करण्याचीच मानसिकता किंवा संदेश दिला गेलेला आहे. यापूर्वीच भारताने आपली हवाई आणि भूदल आण्विक सिद्धता सिद्ध केलेली होती. परंतु भविष्यकाळात अचानकपणे उद्भवणारे संकट आणि आताच्या युद्धजन्य परिस्थितीत नौदलाची क्षमता पाणबुड्यांच्या माध्यमातून अधिक सुसज्ज करणे गरजेचे वाटले होते. म्हणूनच भारताने पूर्णपणे स्वदेशी बनावटीची तिसरी आण्विक पाणबुडी आपल्या ताफ्यामध्ये समाविष्ट केलेली आहे. यामध्ये के चार क्षेपणास्त्र वाहून नेण्याची क्षमता आहे. शत्रूच्या जहाजांवर तिच्या माध्यमातून हल्ला करता येणे शक्य होणार आहे. नौदलाची ही प्रहार क्षमता निश्चितच एकूणच देशाच्या संरक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरते. भारताला तीनही बाजूंनी समुद्राने वेढलेले आहे. किंबहुना ही भारतासाठी सर्वांत मोठी सागरी संरक्षणाची नैसर्गिक संधी म्हणता येईल. तीनही बाजूंनी समुद्र असल्याने या सगळ्या समुद्र सीमा अधिकाधिक सुरक्षित ठेवायच्या असतील तर आधुनिक पद्धतीच्या पाणबुड्या, जहाजे भारताकडे असणे खूप गरजेचे ठरते. तिन्ही बाजूंनी समुद्र आहे आणि आता तीन आधुनिक स्वरूपाच्या पाणबुड्या भारतीय नौदलाच्या सेवेत दाखल झालेल्या आहेत.

भविष्यकाळात आणखी अशा दोन ते तीन पाणबुड्या तयार करण्याची भारताने तयारी ठेवलेली आहे. शस्त्रसज्ज असणे याचा अर्थ भारत स्वत:च्या संरक्षणासाठी समर्थ आहे, असा शत्रूला त्यातून मिळणारा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. आज अमेरिका असेल, इस्त्रायल असेल किंवा इराण सुद्धा गेले महिनाभर युद्धजन्य परिस्थितीचा सामना करत आहेत. प्रत्येकाकडे ही शस्त्रसामर्थ्यता असल्यामुळेच ते एकमेकांवर हल्ले करू शकतात. भारतासारखा लोकसंख्येने आणि भूभागाने मोठा असलेला देश जर सुरक्षित करायचा असेल तर नौदलाबरोबरच हवाई दल आणि भूदलाची क्षमता वाढविणेही तितकेच गरजेचे ठरते. आज जगामध्ये भारत चौथ्या क्रमांकाचा सर्वाधिक शस्त्रसंपन्न आणि सामर्थ्यसंपन्न लष्करी देश मानला जातो. परंतु लोकसंख्येचा विचार केल्यास भारत हा जगातील दुसरा मोठ्या सैन्यसंख्येचाही आणि शस्त्रसंख्येच्या दृष्टीने देखील दुसऱ्या क्रमांकाचा देश होणे आवश्यक ठरते. या माध्यमातून भारताला स्वत:चे सामर्थ्य दाखवायचे असतेच. परंतु आपल्या या शस्त्रसंपन्नतेचा योग्य वेळी योग्य पद्धतीने उपयोग करण्याची क्षमताही टिकून राहते. ऑपरेशन सिंदूरमध्ये याच शस्त्रसंपन्नतेमुळे थेट पाकिस्तानच्या हद्दीत घुसून तेथील दहशतवादी तळ नाहीसे करू शकलो. तेथील कोणत्याही नागरी वस्तीला धक्का न लावता अतिशय समर्पकपणे केलेले हे सर्जिकल ऑपरेशन जगाचासुद्धा कुतूहलाचा विषय ठरला होता. म्हणूनच शत्रूला आपल्या सामर्थ्यातून धाक वाटला पाहिजे आणि भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची त्याची हिंमत होता कामा नये यादृष्टीने देखील अशा प्रकारची ही शस्त्रसंपन्नता महत्त्वाची ठरते.

# आई बापाला विसरू नका; नात्यांची वीण मजबूत ठेवा : वसंत हंकारे



अमळनेर : मांडळ येथे आयोजित व्याख्यानप्रसंगी सुप्रसिद्ध व्याख्याते व समाज परिवर्तनकार वसंत हंकारे.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर :"आपल्या अस्तित्वात आईच्या रक्ताचे आणि वडिलांच्या कष्टाचे मोल अनन्यसाधारण आहे. आई–वडील हेच जीवनाचा खरा आधार असून त्यांच्याविना मानवी जीवन व्यर्थ आहे," असे हृदयस्पर्शी प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते व समाज परिवर्तनकार वसंत हंकारे यांनी केले. अमळनेर तालुक्यातील मांडळ येथे आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.

शिवशाही समिती व मांडळ ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने मांडळ येथे शिव छत्रपती चौकात न समजलेला बाप समजून घेताना या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सुरुवातीला छत्रपतींच्या पुतळ्याचे पूजन करून कु. पूर्वशी पाटील हिच्या हस्ते आरती करण्यात आली. वसंत हंकारे यांनी समाजातील सध्याच्या परिस्थितीवर,पळून जाणाऱ्या मुलींच्या विषयाला,आई बापाला सोडणाऱ्या मुलांच्या विषयाला हात घालत सुरुवातीला विनोदी शैलीत प्रेक्षकांना हसवले आणि नंतर गंभीर होत मुलांसाठी आई वडिलांचे त्याग आणि कष्टमय जीवनावर प्रकाशझोत टाकत तरुणाईच्या डोळ्यात अंजन घातले. आपल्या धीरगंभीर आवाजात आई वडील मुलगा मुलगी यांच्यातील नाते घट्ट करण्याच्या भावनिक आव्हानाला प्रेक्षकांच्या साश्रुनयनांनी प्रतिसाद दिला.

या व्याख्यानाला मराठा समाजाचे अध्यक्ष जयवंतराव पाटील , डॉ सुनील चोरडिया , संजय पाटील , प्रभूदास पाटील , सीताराम कोळी , कलमाडी सरपंच सोनू झालसे यांच्यासह परिसरातील कलमाडी , वावडे ,तरवाडे ,मुडी , हेंकळवाडी , तामसवाडी, मोहाडी , जवखेडा ,कंचनपूर आदी ठिकाणच्या पालक आणि पाल्यानी हजेरी लावली होती.

# यंदा दुष्काळाने परिस्थिती महाभयंकर होणार?

## ४० कोटी लोकांवर संकट ओढवण्याची शक्यता

## अवकाळीच्या सरींमुळे वातावरणात गारवा टिकून

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : देशभर अवघ्या दोन महिन्यांमध्ये पावसाळा सुरू होणार आहे. साधारणपणे जूनच्या पहिल्या आठवड्यात केरळमध्ये मान्सूनचे आगमन होत असते . यानंतर मान्सून संपूर्ण भारतात पोहोचतो, मात्र यंदा मान्सूनच्या नव्या अंदाजामुळे खळबळ उडाली आहे. यंदाच्या मान्सूनमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

यामुळे देशातील ४० कोटी लोकांवर मोठे संकट ओढवण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. भारतात मान्सून दाखल होण्यापूर्वीच एप्रिलच्या सुरुवातीला महाराष्ट्रासह काही राज्यांमध्ये अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. त्यामुळे वातावरणात गारवा टिकून आहे, मात्र प्रत्यक्ष मान्सूनच्या काळात पावसाची कमतरता जाणवू शकते. खासगी हवामान अंदाज संस्था स्कायमेट वेदरने २०२६ च्या मान्सूनबाबत गंभीर इशारा दिला आहे. स्कायमेटच्या अंदाजानुसार या वर्षी देशातील एकूण सरासरीच्या सुमारे ९४ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. हा आकडा ५ टक्के कमी किंवा जास्त असू शकतो. याचाच अर्थ जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरी ८६८.८ मिमी पावसाच्या तुलनेत सुमारे ८१६ मिमी पाऊस पडू शकतो.

यामुळे देशातील अनेक भागांत दुष्काळ पडू शकतो, ज्यामुळे कृषी अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो.भारतात कमी पाऊस पडण्याचे प्रमुख कारण म्हणजे एल नीनो प्रवाह हे आहे. दीड वर्ष ला निनोचा प्रभाव राहिल्यानंतर आता प्रशांत महासागर न्यूट्रल स्थितीकडे जात आहे, पण लवकरच एल–नीनो सक्रिय होण्याची शक्यता आहे. बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि ओडिशा या पूर्वेकडील राज्यांत तुलनेने चांगला पाऊस पडू शकतो, तर उत्तर–पश्चिम आणि मध्य भारतात पावसाची कमतरता राहू शकते. याचा थेट परिणाम भातासह इतर मान्सून पिकांवर होईल.

# अमळनेर तालुक्यात पाच ग्रा.पं.साठी पोटनिवडणुका

## २८ एप्रिल रोजी मतदान; ४ अर्ज दाखल झाले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींमधील रिक्त पदांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून २८ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तहसील कार्यालयात उमेदवारी अर्ज स्वीकृतीला सुरुवात झाली असून आतापर्यंत ४ अर्ज दाखल झाले आहेत. डांगर बु. येथे वार्ड १ मध्ये सर्वसाधारण स्त्री प्रवर्गासाठी एक अर्ज दाखल झाला आहे. तसेच चोपडाई येथे लोकनियुक्त सरपंच पदासाठी एक, वॉर्ड २ मध्ये सर्वसाधारण एक आणि तर वार्ड ३ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एक असे अर्ज दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल झाले आहेत. दरम्यान, चोपडाई व अंतुर्ली–रंजाणे येथे सरपंच पदाची निवड थेट जनतेतून होणार आहे. तर मंगसे, नंदगाव –लडगाव व डांगर बु. येथे विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांसाठी ही पोटनिवडणूक होत आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल असून १५ एप्रिल रोजी छाननी, तर १७ एप्रिलला चिन्हवाटप करण्यात येणार आहे. मतदान २८ एप्रिल रोजी पार पडणार असून आवश्यक असल्यास २९ एप्रिलला पुनर्मतदान घेतले जाणार आहे.

# उन्हाळी हंगाम पीक पाहणीस प्रारंभ

## मुदतीत नोंदणीचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उन्हाळी हंगाम २०२६ च्या पीक पाहणी प्रयोगाला ८ एप्रिल पासून शुभारंभ झाला असून शेतकऱ्यांनी उन्हाळी पिकांची लागवड केली असल्यास विविध शासकीय लाभ मिळवण्यासाठी पीक पाहणी मुदतीत पूर्ण करावी असे आवाहन प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी केले आहे.

पीक विमा , नुकसान भरपाई , आपत्ती परिस्थितीत ,पाऊस ,वादळाने नुकसान झाल्यास भरपाई वेळेवर मिळण्यासाठी तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ मिळण्यासाठी , किमान आधारभूत किमतीने धान्य अथवा शेतीमाल विकण्यासाठी, पीक कर्ज सुविधा मिळण्यासाठी ,ऍग्री स्टॅक योजनेतील सर्व लाभ आणि अनुदान मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या सातबाऱ्यावर पीक पेरा नोंदणे आवश्यक आहे.

उन्हाळी पिकांची नोंद सात बारा उताऱ्यावर नोंदण्यासाठी प्ले स्टोअर वर डी सी एस ऍप उपलब्ध असून शेतकऱ्यांनी ते डाउनलोड करून ऑनलाईन पीक पाहणी मुदतीत करून घ्यावी. 8 एप्रिल पासून पीक पाहणी प्रयोग नोंदवण्याला परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे उन्हाळी हंगामात पिकांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी अचूक पीक पाहणी करून घ्यावी असे आवाहन प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी केले आहे.





अमळनेर : व्यापारी हल्ला प्रकरणी व्यापारी बांधवांनी माजी नगराध्यक्ष व नगरसेवक सौ.जयश्रीताई पाटील तसेच पोलिस प्रशासनाला निवेदन देतांना व्यापारी बांधव.

# व्यापाऱ्यावरील हल्ल्याप्रकरणी गुन्हा दाखल करा; व्यापारी बांधव आक्रमक

## आमदार आणि पोलीस प्रशासनाला दिले निवेदन; बाजारपेठेत संतापाची लाट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर :येथील न्यू प्लॉट भागातील रिषभ फर्निचरचे मालक प्रतीक जैन यांना दुकानात घुसून झालेली मारहाण व शिवीगाळ प्रकरणी संबंधित पुरुष व महिलेवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी शहरातील व्यापारी बांधवांनी करीत आमदारांसह पोलीस प्रशासनास निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की दिनांक 31 मार्च 2026 रोजी प्रतीक जैन व त्यांचे वडील कैलास जैन दुकानात असताना संजय दुसाने नामक व्यक्ती व त्याच्यासोबत असलेल्या एका महिलेने दुकानात येऊन पैशांची मागणी करत प्रतीक जैन यास मारहाण आणि शिवीगाळ करून दुकानात नासधूस केली तसेच कैलास जैन यांच्याशीही हुज्जत घातली,या घटनेत प्रतीक यांच्या हाताला थोडी जखमही झाली आहे.प्रत्यक्षात जैन यांचा दुसाने यांच्याशी शेताचा अथवा इतर कोणताही व्यवहार झालेला नसताना विनाकारण पैशाची मागणी व मारहाण झाल्याचा आरोप जैन यांनी करीत अमळनेर पोलीस ठाण्यात धाव घेतली मात्र पोलिसांनी त्यांची फिर्याद नोंदवून न घेता अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करून घेतली.पोलीस ठाण्यात देखील संबधीत महिलेने प्रतीक यांना धमकी दिली आहे.

सदर प्रकरणी पोलिसानी न्याय न दिल्याने शहरात व्यापारी बांधवाची बैठक होऊन या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.तसेच या घटनेने व्यापारी दहशतीत असल्याने संबंधित व्यक्तिविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदन देण्यात आले अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

सुरवातीला आमदार अनिलदादा पाटील यांच्या निवासस्थानी माजी नगराध्यक्ष सौ.जयश्रीताई पाटील यांनी निवेदन स्वीकारत व्यापारी बांधवाना आश्वस्त केले. यावेळी मार्केट सभापती अशोक पाटील,एल टी पाटील,जितेंद्र ठाकूर व चेतन राजपूत उपस्थित होते. त्यानंतर डीवायएसपी विनायक कोते व पोलीस निरीक्षक यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले.यावेळी बिपीन कोठारी, प्रकाशचंद पारेख,मोहनलाल जैन, प्रा.ओस्तवाल,विनोद अग्रवाल,राजेंद्र झाबक,भरत कोठारी,डॉ रवींद्र जैन, बाळू कोठारी,कैलास लोढा,चेलाराम सैनानी,रिषभ पारेख,किशोर लुल्ला, श्रीराम चौधरी,अभिजित बेदमुथा, हर्षल बोरा,विनोद पारेख,राजेंद्र झाबक,गौरव छाजेड,निलेश ओस्तवाल, पप्पु जैन,राजेश बेदमुथा, कीर्ती कोठारी,गोकूळ पारेख,दिनेश लोढा,रोहित सिंघवी,प्रफुल सिंघवी,आनंद जैन,देवेंन कोठारी, प्रकाश जैन,संदेश जैन यासह असंख्य व्यापारी बांधव उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी उत्सव ‘गुरुचरित्र’ पारायणास प्रारंभ

## धार्मिक सोहळ्याला भाविक आणि सेवेकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर: अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त अमळनेर येथील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्रात नित्य गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ९ एप्रिलपासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्याला भाविक आणि सेवेकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.बुधवार, ९ एप्रिल रोजी सकाळी मंगलमय वातावरणात या उत्सवाची सुरुवात झाली. प्रारंभी ध्वजस्थापना, गणेशपूजन आणि मंडप स्थापना करण्यात आली. त्यानंतर केंद्रातील मुख्य देवतांसह विविध देवतांची शास्त्रोक्त पद्धतीने पूजाअर्चा करण्यात आली. या विधींनंतर सामूहिक गुरुचरित्र पारायणास प्रारंभ झाला असून, संपूर्ण केंद्र परिसर स्वामी नामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला आहे.हा पुण्यतिथी सोहळा ९ एप्रिल ते १६ एप्रिल २०२६ या कालावधीत साजरा होत आहे. सप्ताहात दररोज काकड आरती, नैवेद्य आणि भजन असे कार्यक्रम पार पडणार आहेत. स्वामी समर्थांच्या चरणी सेवा अर्पण करण्यासाठी अमळनेर शहरासह परिसरातील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.केंद्राच्या वतीने शिस्तबद्ध पद्धतीने पारायण सोहळा पार पडत आहे. १५ एप्रिल रोजी महाप्रसादाने सांगता होणार आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले : सामाजिक परिवर्तनाचे महानायक

जन्मदिन विशेष


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय समाजव्यवस्थेतील अन्याय, विषमता आणि अंधश्रद्धेच्या अंधकारात ज्या महामानवाने ज्ञानाचा दिवा लावला, ते नाव म्हणजे महात्मा जोतिराव फुले. एक थोर विचारवंत, समाजसुधारक, लेखक आणि क्रांतीकारक अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या जोतिरावांनी आधुनिक भारताच्या निर्मितीचा पाया रचला. "विद्येविना मती गेली" हा मंत्र देऊन त्यांनी बहुजन समाज आणि स्त्रियांना गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचे बळ दिले.

११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे जोतिरावांचा जन्म झाला. त्यांचे पूर्वज सातारा जिल्ह्यातील कटगुणचे, पण पुण्यात फुलांचा व्यवसाय करत असल्याने त्यांना 'फुले' हे नाव मिळाले. जोतिरावांनी पुण्यातील स्कॉटिश मिशनरी शाळेत शिक्षण घेतले. या शिक्षणामुळेच त्यांना मानवी हक्क, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांची जाणीव झाली. थॉमस पेन यांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता, ज्यातून त्यांना समाजातील जातीभेदाची दाहकता उमजली.

त्या काळी स्त्रियांना शिक्षण मिळणे दुरापास्त होते. स्त्रियांचे अज्ञान हेच समाजाच्या मागासलेपणाचे कारण आहे, हे जोतिरावांनी ओळखले. १ जानेवारी १८४८ रोजी त्यांनी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून इतिहास घडवला. समाजाचा प्रचंड विरोध पत्करून त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकवले आणि त्यांना देशातील पहिली महिला शिक्षिका बनवले. या दांपत्याने अंगावर शेण-दगड झेलले, पण शिक्षणाचे पवित्र कार्य थांबवले नाही.

२४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. पुरोहितांच्या मध्यस्थीशिवाय ईश्वराची भक्ती करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, हा विचार त्यांनी मांडला. "सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्ती" हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. सत्यशोधक समाजाने समाजातील तळागाळातील लोकांना आत्मसन्मानाने जगण्याची वाट दाखवली आणि गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवण्यास प्रवृत्त केले.



महात्मा फुले हे केवळ बोलणारे सुधारक नव्हते, तर ते कृतीशील नेते होते. अस्पृश्य मानल्या गेलेल्या बांधवांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये म्हणून त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला. तत्कालीन सनातनी समाजात हे पाऊल उचलणे म्हणजे क्रांतीच होती. त्यांनी मानवाला केंद्रस्थानी मानून 'सार्वजनिक सत्यधर्म' मांडला, ज्यात जात, धर्म आणि लिंगापेक्षा माणुसकी श्रेष्ठ मानली गेली.

जोतिरावांनी शेतकऱ्यांच्या कष्टाचे आणि शोषणाचे जवळून निरीक्षण केले होते. 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडली. अज्ञान, कर्जबाजारीपणा आणि सरकारी अधिकाऱ्यांचे शोषण यातून शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी, यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड आणि जलसिंचनाची सोय असावी, असा आग्रह त्यांनी दीडशे वर्षांपूर्वी धरला होता.

त्यांच्या अफाट कार्याचा गौरव म्हणून ११ मे १८८८ रोजी मुंबईतील मांडवी येथे कोळीवाडा भागात जनतेने त्यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आपले 'गुरु' मानले, यावरूनच त्यांच्या विचारांची व्याप्ती लक्षात येते. २८ नोव्हेंबर १८९० रोजी या महामानवाचे निधन झाले, परंतु त्यांनी दिलेला विचारांचा वारसा आजही कोट्यवधी लोकांसाठी दीपस्तंभ आहे.

महात्मा फुले यांनी केवळ शाळा काढल्या नाहीत, तर त्यांनी विचारांची मशागत केली. आजच्या आधुनिक भारतातील स्त्री शिक्षण, आरक्षण, शेतीविषयक सुधारणा आणि सामाजिक समता या सर्वांचे मूळ महात्मा फुलेंच्या विचारात आहे. त्यांनी दिलेला हा संदेश आजही तितकाच जिवंत आहेः

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले!"

# बकिंघम पैलेस बड़ा इनका घर!

## मिलिए उस महारानी से जो रहती हैं दुनिया के सबसे विशाल महल में...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत में भले ही रियासतों का दौर कानूनी रूप से समाप्त हो चुका हो, लेकिन कई राजघरानों ने अपनी सदियों पुरानी विरासत और शाही परंपराओं को आज भी जीवंत रखा है। गुजरात की बड़ौदा रियासत इसी गौरवशाली इतिहास का एक चमकता हुआ पन्ना है, जिसकी भव्यता दुनिया भर में मशहूर है। यहां के शाही परिवार का रहन-सहन और शाही महल लक्ष्मी विलास पैलेस के चर्चे आज भी देश-विदेश में होते रहते हैं। इस महल को दुनिया का सबसे बड़ा निजी आवास माना जाता है। बड़ौदा की महारानी राधिकाराजे गायकवाड़ अपने परिवार के साथ लक्ष्मी विलास पैलेस में रहती हैं। उन्हें देश की सबसे खूबसूरत और मॉडर्न महारानी माना जाता है. वह न केवल अपनी सुंदरता बल्कि अपनी बुद्धिमत्ता और आधुनिक विचारों के लिए भी जानी जाती हैं। लक्ष्मी विलास पैलेस की विशालता का अंदाजा आप इस बात से लगा सकते हैं कि यह लंदन के प्रसिद्ध 'बकिंघम पैलेस' से भी चार गुना बड़ा है। लगभग ६०० एकड़ के विशाल क्षेत्र में फैला यह महल वास्तुकला का एक बेजोड़ नमूना है, जिसे महाराजा सयाजीराव गायकवाड़ तृतीय ने बनवाया था। इस महल में कुल १७० कमरे हैं। यह महल गायकवाड़ परिवार का निजी निवास है। लक्ष्मी विलास पैलेस के कुछ हिस्सों को अब पर्यटकों के लिए खोल दिया गया है ताकि वे भी इस इतिहास को देख सकें। महल के अंदर एक बड़ा गोल्फ कोर्स, मोती बाग पैलेस और एक म्यूजियम भी है, जिसमें बेशकीमती कलाकृतियों का संग्रह मौजूद है।



महारानी राधिकाराजे को भी अपने पिता डॉ. एमके रणजीतसिंह झाला की तरह भी पढ़ने-लिखने का बहुत शौक है, जिसने उनके ज्ञान के दायरे को विस्तृत किया है। महाराज समरजीतसिंह गायकवाड़ से शादी करने से पहले वह एक पत्रकार के तौर पर अपनी सेवाएं दे रही थीं। पत्रकारिता के क्षेत्र में काम करने के अनुभव ने उन्हें समाज की वास्तविकताओं और जनसंपर्क की बारीकियों से अच्छी तरह रूबरू कराया था। राधिका और समरजीत सिंह गायकवाड़ की शाही शादी साल २००२ में संपन्न हुई थी, जो उस समय की सबसे चर्चित शादियों में से एक थी। शादी के बाद राधिकाराजे ने बड़ौदा की परंपराओं को इतनी बखूबी अपनाया कि वह जल्द ही वहां के लोगों की पसंदीदा बन गईं। साल २०१२ में एक पारंपरिक रस्म के दौरान महाराज समरजीत सिंह गायकवाड़ को बड़ौदा का ताज सौंपा गया था। महारानी राधिकाराजे केवल महलों तक सीमित नहीं हैं, बल्कि वह भारतीय हथकरघा और बुनकरों को बढ़ावा देने के लिए भी लगातार काम करती हैं। वह खुद भी अक्सर पारंपरिक चंदेरी और पैठणी साड़ियों में नजर आती हैं, जो उनके रॉयल लुक को गरिमापूर्ण बनाता है। उनके इस योगदान ने उन्हें फैशन की दुनिया में एक 'स्टाइल आइकन' के साथ-साथ एक समाज सुधारक के रूप में भी स्थापित किया है। राधिका और समरजीत सिंह गायकवाड़ की दो बेटियां नारायणी और पद्मजा है। महारानी अक्सर अपनी बेटियों के साथ महल की तस्वीरें और अपने पारिवारिक पल सोशल मीडिया पर साझा करती रहती हैं। वह चाहती हैं कि उनकी बेटियां भी अपनी समृद्ध विरासत का सम्मान करें और साथ ही आधुनिक दुनिया की चुनौतियों के लिए तैयार रहें।




# डॉ. जेम्स पार्किन्सन : वैद्यकीय शास्त्रातील द्रष्टे संशोधक

जन्मदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैद्यकीय विज्ञानाच्या इतिहासात अशा काही व्यक्ती होऊन गेल्या, ज्यांनी आपल्या सूक्ष्म निरीक्षणाने असाध्य रोगांची ओळख जगाला करून दिली. अशाच महान संशोधकांपैकी एक म्हणजे डॉ. जेम्स पार्किन्सन. ज्या आजाराला आज आपण 'पार्किन्सन' म्हणून ओळखतो, त्या दुर्धर आजाराचे पहिले शास्त्रीय वर्णन करण्याचे श्रेय डॉ. जेम्स यांना जाते. ते केवळ एक डॉक्टर नव्हते, तर एक भूगर्भशास्त्रज्ञ, राजकारणी आणि समाजसुधारकही होते.जेम्स पार्किन्सन यांचा जन्म ११ एप्रिल १७५५ रोजी लंडनमध्ये झाला. त्यांचे वडील जॉन पार्किन्सन हे देखील एक प्रसिद्ध डॉक्टर होते. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत जेम्स यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि लंडनच्या 'होक्स्टन' भागात आपली प्रॅक्टिस सुरू केली. वैद्यकीय व्यवसायासोबतच त्यांना निसर्ग आणि मानवी हक्कांबद्दल मोठी ओढ होती.डॉ. जेम्स पार्किन्सन यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे १८१७ मध्ये त्यांनी प्रकाशित केलेला



'ॲन एसे ऑन द शेकिंग पाल्सी' हा शोधनिबंध.ते एक उत्तम जीवाश्मशास्त्रज्ञ होते. त्यांनी जीवाश्मांवर 'ऑर्गेनिक रिमेन्स ऑफ अ फॉर्मर वर्ल्ड' नावाचा तीन खंडांचा ग्रंथ लिहिला, जो त्याकाळी अत्यंत महत्त्वाचा मानला गेला.ते एक सक्रिय राजकीय कार्यकर्ते होते. गरिबांना न्याय मिळावा आणि कामगारांच्या स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी त्यांनी अनेक पत्रके प्रसिद्ध केली होती. यामुळे त्यांना काही काळ वादाचा आणि चौकशीचाही सामना करावा लागला होता.त्यांनी केवळ मज्जासंस्थेच्या आजारांवरच नव्हे, तर 'अपेंडिसायटिस' मुळे होणाऱ्या मृत्यूचे पहिले वर्णनही केले होते. वैद्यकीय ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे यासाठी त्यांनी घरगुती उपचारांवर आणि आरोग्याच्या जागरूकतेवर अनेक पुस्तके लिहिली.डॉ. जेम्स पार्किन्सन यांचा जन्मदिवस ११ एप्रिल हा जगभरात 'जागतिक पार्किन्सन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी या आजाराबद्दल जनसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण केली जाते आणि रुग्णांना धीर दिला जातो.डॉ. जेम्स पार्किन्सन यांनी दोनशे वर्षांपूर्वी मांडलेले विचार आणि केलेले निरीक्षण आजही आधुनिक वैद्यकशास्त्राचा पाया मानले जातात. साधनसामग्रीची कमतरता असूनही केवळ जिज्ञासू वृत्ती आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी मानवजातीची मोठी सेवा केली. आज पार्किन्सन आजारावर अनेक प्रगत उपचार उपलब्ध असले, तरी त्या रोगाचे मूळ ओळखणाऱ्या या महामानवाचे ऋण कधीही विसरता येणार नाहीत.

# भारताचे 'मयूर सिहासन' आजही इराणच्या राजवाड्यात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुघलांचे मयूर सिंहासन हे भारतातील सर्वांत अद्भुत वस्तूंमध्ये गणले जात होते.


तख्त-ए-ताऊस म्हणजे हेच प्रसिद्ध 'मयूर सिंहासन' मुघल साम्राज्याची शान होते. मयूर सिंहासह हे मौल्यवान रत्नांनी आणि सोन्याने सजलेले होते. त्यामुळे ते अधिक आकर्षक वाटे.

१७३९ मध्ये इराणचा सम्राट नादिरशहाने दिल्लीवर हल्ला करून हे सिंहासन लुटून नेले.

लुटीच्या मालासोबतच त्याने मयूर सिंहासनदेखील इराणला नेले. ते आजतागायत भारतात परतलच नाही.

इराणमध्ये गेल्यानंतर सिंहासनाचे मूळ स्वरूप टिकून राहिले नाही.

१७८९ मध्ये आगा मुहम्मद शाहला हे सिंहासन तुटलेल्या अवस्थेत सापडले होते.



त्यातील रत्नांचा वापर करून नवीन सिंहासन बनविण्यात आल्याचे काही इतिहासकार सांगतात.

हे नवीन सिंहासन आज तेहरानच्या राजवाड्यात ठेवल्याचे सांगितले जाते.


मुघलांचे मूळ मयूर सिंहासन आज अस्तित्वात नाही, पण त्याची कथा अजूनही जीवंत आहे.

# शिमला-मनालीला टक्कर देतात भारतातील ही ४ हिल स्टेशन

## पर्यटकांना मिळते शांतता आणि समाधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गर्दी, आवाज आणि व्यापारीकरणापासून दूर राहून निसर्गाच्या सान्निध्यात जर तुम्हाला वेळ घालवायचा असेल तर पुढील पाच हिल स्टेशन तुमच्यासाठी उत्तम पर्याय आहेत. जिथे तुम्हाला केवळ निसर्गरम्य वातावरण नाही तर खऱ्या अर्थाने शांतता आणि समाधानही मिळेल. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील लोकप्रिय पर्यटनस्थळांवर वाढती गर्दी आता पर्यावरणावर ताण आणू लागली आहे. अशा परिस्थितीत शांतता, निसर्ग आणि निवांत वेळ शोधणाऱ्या पर्यटकांसाठी काही हिल स्टेशन उत्तम पर्याय ठरत आहेत. चला जाणून घेऊया अशाच ४ सुंदर आणि शांत ठिकाणांबद्दल.



सेराज व्हॅलीमध्ये असलेले शोजा हे एखाद्या परीकथेतल्या गावासारखं भासणारं ठिकाण आहे. दाट जंगले, धुक्याने झाकलेले डोंगर आणि शांत वातावरण हे याचे वैशिष्ट्य. इथे गजबजलेल्या कॅफे किंवा मॉल्स नाहीत पण लाकडी कॉटेज आणि सुंदर ट्रेकिंग रूट्स जरूर मिळतात.

ग्रेट हिमालयन नॅशनल पार्कजवळ असलेली तीर्थन व्हॅली निसर्गप्रेमींसाठी स्वर्गच आहे. स्वच्छ नदीकिनारे, ट्राउट मासेमारी आणि शांत असणारे हे ठिकाण खास बनते. इतर हिल स्टेशनच्या तुलनेत कमी व्यापारीकरण असल्याने इथे खऱ्या अर्थाने निवांतपणा अनुभवता येतो. उत्तराखंडमधील एक लपलेले रत्न म्हणजे चकराता. दाट जंगले, अप्रतिम दृश्ये आणि प्रसिद्ध टायगर फॉल्स यामुळे हे ठिकाण खास आहे. मसुरीच्या तुलनेत कमी गर्दी असल्याने शांततेचा अनुभव घेण्यासाठी हे उत्तम ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ८५०० फूट उंचीवर वसलेलं कनाताल ताज्या हवेसाठी आणि सुंदर दृश्यांसाठी ओळखले जाते. कॅम्पिंग, ट्रेकिंग आणि निसर्गभ्रमंतीसाठी हे ठिकाण परफेक्ट आहे.

# गाड्यावर फळविक्रीतून वार्षिक ३ कोटींची उलाढाल!

## ५ लाखांच्या कर्जाने अब्दुल रईस यांनी केला व्यवसायाचा प्रारंभ

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मध्यप्रदेशातील बुरहानपूरमधून एक अशी कथा समोर आली आहे, जी सिद्ध करते की जर मेहनत आणि जिद्द असेल तर परिस्थिती बदलायला वेळ लागत नाही. अब्दुल रईस यांनी सुमारे ३० वर्षांपूर्वी रस्त्यावर गाड्यावर फळे विकून आपल्या प्रवासाची सुरुवात केली होती. त्या काळी परिस्थिती अशी होती की, दिवसभर उभे राहूनही अनेकदा फळे विकली जात नसत.सुरुवातीचा काळ सोपा नव्हता. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट व्हायची. अनेकदा व्यवसाय ठप्प व्हायचा, पण रईस यांनी हार मानली नाही. त्यांनी आपल्या नातेवाईकांकडून आणि कुटुंबाकडून मदत घेतली आणि सुमारे ५ लाख




रुपयांचे कर्ज काढून पुन्हा नव्या जोमाने सुरुवात केली.हळूहळू त्यांच्या कष्टाला यश मिळू लागले. आज तोच गाड्यावरचा व्यवसाय एका मोठ्या उद्योगात रूपांतरित झाला आहे. रईस सांगतात की, आता त्यांच्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल सुमारे ३ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे आणि ते सुमारे १५ लोकांना रोजगारही देत आहेत.

आज त्यांचा हा व्यवसाय "नीलम फल फ्रूट" या नावाने ओळखला जातो. बुरहानपूरमध्ये त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली असून लांबून लोक त्यांच्याकडे फळे खरेदी करण्यासाठी येतात. रईस आता केवळ फळे विकत नाहीत, तर एक मोठे नेटवर्क सांभाळतात. ते देशातील सुमारे १० राज्यांमधून फळे मागवतात आणि ट्रान्सपोर्टचे कामही पाहतात. त्यांच्याकडे आंबा, सफरचंद, जांभूळ, चिकू, पपई, मोसंबी, अननस अशा अनेक प्रकारच्या फळांची विक्री होते.

आज त्यांच्या दुकानात दररोज २ ते ३ गाड्या भरून फळे येतात आणि विकली जातात. अनेक छोटे व्यापारी त्यांच्याकडून फळे खरेदी करून बाजारात विकतात. म्हणजेच, एका गाड्यापासून सुरू झालेला हा प्रवास आता अनेकांच्या रोजीरोटीचा आधार बनला आहे. अब्दुल रईस यांची गोष्ट हेच शिकवते की, परिस्थिती कशीही असो, जर माणसाने मनाशी पक्के ठरवले तर तो काहीही साध्य करू शकतो. आज ते केवळ स्वतः यशस्वी झाले नाहीत, तर इतरांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहेत.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# सद्गुरू श्री जंगली महाराज : हिमालयातील योगी ते पुण्याचे महासिद्ध – एक दिव्य जीवनगाथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुणे शहराच्या गजबजलेल्या हृदयात, जिथे आज आधुनिकतेचा झगमगाट आहे, तिथे एक असे स्थान आहे जिथे पाऊल ठेवताच मनाला अतीव शांतता लाभते. ते स्थान म्हणजे 'सद्गुरू श्री जंगली महाराज मंदिर'. ज्या महापुरुषाच्या नावाने हा परिसर आणि रस्ता ओळखला जातो, त्या श्री जंगली महाराजांचे जीवन म्हणजे अध्यात्म, योगसाधना, राष्ट्रभक्ती आणि चमत्कारांनी विणलेली एक अद्भुत गाथा आहे. श्री जंगली महाराजांचा जन्म १८०३ च्या सुमारास वैशाख शुद्ध पंचमीला झाला. त्यांच्या जन्माबद्दल दोन प्रवाह आहेत. काही अभ्यासकांच्या मते त्यांचा जन्म कर्नाटकातील हुबळीजवळ एका ब्राह्मण कुटुंबात झाला, तर काहींच्या मते ते बडोद्याचे असून झांशीच्या राणी लक्ष्मीबाईंच्या 'तांबे' घराण्याशी संबंधित एका जहागीरदार कुटुंबातील होते.लहानपणीच त्यांच्यावर अध्यात्माचे संस्कार झाले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे उपनयन (मुंज) झाले. मात्र, लवकरच त्यांच्यावर माता-पित्याचा वियोग ओढवला. नियतीला त्यांना एका मोठ्या कार्यासाठी तयार करायचे होते. एका संध्याकाळी एका अनामिक योगी पुरुषाने त्यांना घराबाहेर बोलावले आणि अवघ्या १०-१२ वर्षांच्या या बालकाने एका क्षणात संसाराचा त्याग केला. त्यानंतर ते पुन्हा कधीही आपल्या गावी परतले नाहीत.

तो योगी पुरुष महाराजांना पदयात्रा करत 'माहेश्वर' येथे घेऊन गेला. तिथे त्यांनी श्री विश्वरूपानंद महाराज यांच्या स्वाधीन केले. विश्वरूपानंद हे महान योगी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराजांनी अष्टांग योगाचा सखोल अभ्यास केला. योगात पूर्णत्व प्राप्त झाल्यावर त्यांनी अनवाणी पायांनी नर्मदा प्रदक्षिणा केली. या प्रवासात त्यांच्याकडे केवळ एक कमंडलु आणि एक वस्त्र होते.पुढील प्रवासात ते हिमालयात गेले आणि तिथे तब्बल १२ वर्षे वास्तव्य केले. याच काळात त्यांनी नाथसंप्रदायाची दीक्षा घेतली. हिमालयातील योग्यांमध्ये ते 'योगी जागरनाथ' या नावाने ओळखले जाऊ लागले. 'जागरनाथ' हे नाव त्यांना त्यांच्या सदैव जागृत अवस्थेमुळे मिळाले



होते. योगाच्या उच्च श्रेणीत गेल्यावर साधकाची निद्रा अत्यंत कमी होते आणि तो सतत आत्मचिंतनात मग्न असतो, हेच महाराजांच्या बाबतीत घडले होते.श्री जंगली महाराजांचे चरित्र केवळ आध्यात्मिक नाही, तर ते ज्वलंत राष्ट्रभक्तीनेही भरलेले आहे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी एक सैनिक आणि मार्गदर्शक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे यांच्याशी त्यांचा जवळचा संबंध होता.महाराजांनी स्वतः शस्त्र हातात धरले नाही, पण त्यांनी युद्धाच्या काळात सैनिकांना अन्नपुरवठा करण्याचे अशक्य काम केले. असे म्हटले जाते की, तात्या टोपेंच्या फौजेचा पराभव होऊन इंग्रजांनी सर्व सामग्री लुटली, तरी दुसऱ्या दिवशी सकाळी सैनिकांना अन्नाचा पुरवठा झालेला असे. हे सर्व महाराजांच्या योगबलाचे फळ होते. या काळात त्यांच्या शरीरावर तलवारीचे अनेक वार झाले आणि चार वेळा त्यांना गोळ्याही लागल्या, पण योगाच्या सामर्थ्यामुळे त्यांनी आपला देह टिकवून ठेवला. इंग्रजांना जेव्हा हे कळले की हा मनुष्य मरत नाही, तेव्हा त्यांनी महाराजांना नैनितालच्या घनदाट जंगलात सोडून दिले. तिथेच त्यांना 'अश्वत्थामा' आणि 'परशुराम' यांचे दर्शन झाले, असे मानले जाते.

१८५७ च्या युद्धानंतर महाराज महाराष्ट्रात आले. काही काळ कृष्णाकाठी 'रेठरे हरणाक्ष' येथे वास्तव्य केल्यानंतर ते पुण्यात आले. त्यावेळी पुण्याचा भांबुर्डे हा भाग (आजचा शिवाजीनगर परिसर) घनदाट झाडी, निवडुंग आणि जंगली जनावरांनी भरलेला होता. महाराज तिथे एका सिताफळीच्या झाडाखाली किंवा पाताळेश्वर लेण्यांजवळील एका गुंफेत ध्यान लावून बसत.भांबुर्ड्यातील अडाणी, भाविक जनतेला हा तेजस्वी, आजानुबाहू (गुडघ्यापर्यंत हात असलेला) पुरुष कोण आहे, हे माहित नव्हते. ते जंगलात राहायचे, म्हणून लोक त्यांना 'जंगली महाराज' किंवा 'जंगली बाबा' म्हणू लागले. प्रसिद्धीचा त्यांना अत्यंत तिटकारा होता. लोक त्यांना विचारायला गेले की ते आपले नाव 'जागरनाथ' सांगत, पण जनमानसात 'जंगली महाराज' हेच नाव अजरामर झाले.महाराजांची दिनचर्या अत्यंत शिस्तबद्ध आणि योगिक होती. ते ब्राह्ममुहूर्तावर उठून योगमार्गाने अदृश्य रूपात काशीला जाऊन स्नान करत, असे त्यांचे भक्त सांगतात. पुण्यात असताना ते रोज सकाळी 'रोकडोबा' मंदिराचे दर्शन घेत आणि त्यानंतर भिक्षा मागून जो काही मिळेल तो अल्प आहार घेत.दुपारी ते भक्तांच्या शंकांचे निरसन करत. ते दासबोध, ज्ञानेश्वरी आणि एकनाथी भागवत या ग्रंथांवर निरुपण करत. त्यांची शिकवण साधी होती 'सच्चिदानंद सद्गुरू' हा मंत्र त्यांच्या मुखी सतत असायचा. ते म्हणायचे की, सर्व धर्मांचे मूळ एकच आहे. म्हणूनच आजही हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही धर्मांचे लोक त्यांच्या चरणी नतमस्तक होतात. नाथपंथ आणि सुफी पंथातील जो समन्वयाचा धागा आहे, तो महाराजांच्या चरित्रात स्पष्ट दिसतो.महाराजांच्या आयुष्यात अनेक चमत्कारीक घटना घडल्या, ज्या त्यांच्या सिद्धतेची साक्ष देतात:एकदा एका साधू संमेलनात ढोंगीपणावर चर्चा सुरू असताना, महाराजांनी एका महिलेच्या पायातील चांदीचे तोडे केवळ स्पर्शाने सोन्याचे करून दाखवले. त्यातील एक तोडा त्यांनी पुढे काशी विश्वेश्वराला अर्पण केला. कृष्णेला महापूर आलेला असताना महाराज केवळ आपल्या घोंगड्यावर बसून नदी पार करत असत.कुरूगड्डी येथे वास्तव्यास असताना त्यांनी आज्ञा दिली होती की, जोपर्यंत मी इथे आहे तोपर्यंत कोणत्याही विषारी प्राण्याने कोणालाही दंश करू नये. आणि तसेच घडले. आपल्या योगबलाने त्यांनी काही मृतांना पुन्हा जीवनदान दिल्याचेही दाखले जुन्या पोथ्यांमध्ये आढळतात.
महाराजांनी अनेक शिष्य तयार केले, पण त्यात रखमाबाई (आईसाहेब) यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. रखमाबाईंनी महाराजांच्या आज्ञेनुसार १२ वर्षे मिरजेत भिक्षा मागून साधना केली. महाराजांच्या समाधीनंतर रखमाबाई आणि तुळसाक्का यांनी त्यांचा संप्रदाय १० वर्षे समर्थपणे चालवला. आज समाधी मंदिरासमोर जे राम मंदिर आहे, ते रखमाबाईंनीच बांधून घेतले आहे. शुक्रवार, ४ एप्रिल १८९० (चैत्र शुद्ध चतुर्दशी, शके १८१४) रोजी सायंकाळी ५:३०वाजता महाराजांनी आपली इहलोकीची यात्रा संपवण्याचे ठरवले. त्यांनी अष्टांग योगाच्या धरणेत डोळे मिटले, ब्रह्मरंध्रातून प्राण सोडले आणि ते समाधिस्थ झाले. ही वार्ता पुण्यात वाऱ्यासारखी पसरली. आपल्या या लाडक्या आजानुबाहू संताला निरोप देण्यासाठी हजारो लोक जमले. रोकडोबा मंदिरापासून समाधी स्थानापर्यंत त्यांची प्रचंड मिरवणूक निघाली. फुलांनी सजवलेल्या विमानासारख्या आसनातून त्यांना समाधीस्थळी नेण्यात आले.

आज जंगली महाराज मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून ते एक शक्तीपीठ आहे. तिथे महाराजांची धुनी आजही अखंड प्रज्वलित आहे. वर्षातून दोनदा (समाधी दिन आणि जन्मोत्सव) तिथे मोठा उत्सव साजरा होतो. पुण्यातील तरुण पिढीपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांसाठी महाराज हे आजही मार्गदर्शक आहेत.

सद्गुरू श्री जंगली महाराज म्हणजे ज्ञानाचा सूर्य, वैराग्याचा हिमालय आणि करुणेचा सागर होते. त्यांनी समाजाला जात-पात आणि धर्माच्या पलीकडे जाऊन माणुसकी आणि ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवला. "मी कुठलाही असलो, तरी मी तुमचा आहे," ही त्यांची भावना आजही त्यांच्या भक्तांना आधार देते. हिमालयातील एका योग्याने पुण्याच्या मातीत येऊन जे चैतन्य पेरले, ते आजही जंगली महाराज रोडवरील त्या पवित्र समाधीच्या रूपाने सर्वांना प्रेरणा देत आहे.

**|| सच्चिदानंद सद्गुरू जंगली महाराज की जय ||**

# तुळशी पुजनीय का आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**अध्यात्मिक महत्व :** आपल्या पुर्वासुरींनी पहाटे प्रत्येकाने तुळशीला पाणी घालावे असे सांगीतले आहे. त्यापाठीमागेपुढील दोन महत्वाची कारणे आहेत.याबाबत पुराणात एक कथा सांगितली जाते. जालिंदर नावाचा एक अत्यंत पराक्रमी राक्षस असतो. आपल्या पराक्रमाच्या बळावर त्याने देवांना आणि साधू-संतांना पार त्राहीत्राही करून सोडलेले असते. त्याला कसे रोखायचे, असा प्रश्न सर्व देवांना पडतो. मग देव विष्णूला शरण जाऊनजालिंदरापासून आपले रक्षण करण्याची विनंती करतात. विष्णूनी जेव्हा जालिंदराबाबत माहिती काढली, तेव्हा त्यांना असे कळते की, त्याची पत्नी वृंदा ही सतीपतीव्रता असते. तिच्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यांनेच जालिंदर विजयी होत असतो. त्याला पराजीत करायचे असेल, तर वृंदाच्या पतिव्रत्याचा भंग करणे हाच उपाय उरतो. ते करण्यास कुणीही धजावत नाही. अखेर ती जबाबदारी विष्णू स्वीकारतात. जालिंदराचे रूप धारण करून विष्णू वृंदेच्या महालात जातात. आपले पती आले आहेत असे समजून वृंदा त्यांना अलिंगन देते. तिच्या पतिव्रत्याचा भंग होताच, जालिंदराचा मृत्यू होतो. देवांनी मारलेल्या बाणाने त्याचे शीर तुटते आणि ते वृंदेच्या दारात पडते. नवऱ्याचे शीर पाहताच वृंदा चकीत होते आणि विष्णूला विचारते, तू कोण आहेस? त्यावर विष्णू आपल्या खऱ्या रूपात प्रकटतात. संतप्त झालेली वृंदा विष्णूला तू दगड होऊन पडशील आणि मला माझ्या पतीचा विरह तुझ्यामुळे घडला, तसाच तुलाही तुझ्या पत्नीचा विरह सहन करावा लागेल, असा शाप देते.

भगवंत तिची क्षमा मागतात. तेव्हा वृंदा म्हणते, तू मला आता भ्रष्ट केलेस, आता मला कोण स्विकारील? तेव्हा भगवंत म्हणतात, 'मी तुझा स्वीकार करतो. इतकेच नव्हे तर जे तुझी पूजा करतील त्यांच्यावर माझी कृपा असेल.' त्यानंतर वृंदा सती गेली. पुढे तिच्या शापामुळेच राम अवतारामध्ये भगवंताला सीतेचा विरह सहन करावा लागला. देव दगड होऊन पडले.त्यालाच 'शालिग्राम' म्हणतात.ज्या ठिकाणी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले, तिथे तुळशीचे रोप उगवले.तीच ही तुळस.वृंदेच्या नावावरूनच ज्या ठिकाणी तुळस लावली जाते,तिला 'वृंदावन' असे म्हटले जाते. तीच तुळस कृष्णाने, पांडुरंगानेही धारण केली. तिला भगवंताने स्वीकारले याचे प्रतीक म्हणून 'शालिग्राम' हा जो दगड आहे, त्याला देव मानून त्याचा विवाह तुळशीसोबत लावला जातो. ती भगवंतांची प्रिय होते, म्हणूनच तिला धारण करणा-यांवर भगवंत प्रेम करतो, अशी श्रद्धा आहे. याच विचाराने वारक-यांनीही तुळशीला आजतागायत पूजनीय मानले आहे.


**वैज्ञानीक महत्व :** जगातील प्रत्येक वनस्पती दिवसा ऑक्सिजन व रात्री कार्बन डाय ऑक्साईड सोडते. अपवाद फक्त पिंपळ, कारण पिंपळ रात्रीही ऑक्सिजन सोडतो. म्हणुनच भगवान श्रीकृष्णाने म्हटले आहे की, सर्व वृक्षात मी अश्वथ पिंपळ आहे. मात्र तुळस ही जगातील एकमेव वनस्पती आहे की जी दिवसा ऑक्सिजन, रात्री कार्बन डाय ऑक्साईड व फक्त पहाटेच्या वेळी ०.०३% इतका ओझोन वायु सोडते. व या वायुच्या संपर्कात मनुष्य आल्यास त्याच्या मेंदुत सेरॉटोनीन नावाचे संप्रेरक स्त्रवते. ज्यामुळे मनुष्य दिवसभर प्रसन्न व आनंदी राहतो. तसेच त्याची रोग प्रतिकारक शक्ती बळकट होते. आयुर्वेदानुसार तुळशीमुळे सर्दी, खोकला, ताप, त्वचारोग, मधुमेह, रक्तदाब, पोटाचे व किडनीचे विकार, कॅन्सर, होत नाहीत. कारण तुळशीच्या बिया, मुळे, खोड, पाने, फुले (मंजिरी) हे सर्वच औषधी आहेत. शिवाय तुळशीतुन निघणाऱ्या शुभ स्पंदनांमुळे वातावरण शुद्धी होते. या सर्व बाबींचा गहन विचार करुनच पुर्वासुरींनी पहाटे तुळशीला पाणी घालण्यास सांगीतले आहे.

# श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज प्रवचन सेवा

## सत्संगतीचे दोन मार्ग आणि त्यांचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सत्संगती ही मानवी जीवनात अत्यंत विलक्षण बदल घडवून आणणारी शक्ती आहे. संतांचा सहवास प्रामुख्याने दोन प्रकारे लाभू शकतो: पहिला म्हणजे संतांच्या देहाचा सहवास आणि दुसरा म्हणजे संतांनी सांगितलेल्या साधनेचे आचरण करणे.संतांच्या प्रत्यक्ष देहाचा सहवास मिळणे ही अत्यंत दुर्मिळ आणि भाग्याची गोष्ट आहे. मात्र, यात काही वेळा अडथळे येऊ शकतात. संत आपल्या बाह्य वर्तनातून ओळखणे कठीण असते, त्यामुळे त्यांच्या वागणुकीवरून मनात शंका निर्माण होऊ शकते. तसेच, जर चुकून एखाद्या ढोंगी व्यक्तीच्या नादी लागलो, तर नुकसान होण्याची भीती असते. म्हणून प्रत्यक्ष देहसंगाचा मार्ग कधीकधी आव्हानात्मक ठरू शकतो.परंतु, जर खरोखरच खऱ्या संतांचा प्रत्यक्ष सहवास लाभला, तर प्रगतीचा वेग अफाट वाढतो. जसे वाहनात बसल्यावर त्याचा वेग आपला होतो, तसेच खऱ्या संतांच्या सानिध्यात केवळ स्वतःचे अस्तित्व विरघळवून शांत राहिल्याने अहंकाराचा नाश होतो आणि



वासना क्षीण होतात. म्हणूनच तुकाराम महाराजांनी मुक्तीऐवजी केवळ संतसंगतीची मागणी देवाकडे केली.संतांनी सांगितलेल्या मार्गावरून किंवा साधनेवरून चालणे हा सर्वात सुरक्षित मार्ग आहे. एखादा माणूस स्वतः भोंदू असला, तरी तो दुसऱ्याला उपदेश करताना सहसा बरोबरच सांगतो. साधकाने शुद्ध भावनेने त्या साधनेचे आचरण केले, तर त्याला सत्संगतीचा पूर्ण लाभ मिळतोच.संतांच्या सहवासामुळे नाम घेण्याची ओढ लागते. बुद्धी स्थिर करण्याचे सामर्थ्य केवळ 'नामात' आहे. नामस्मरणामुळे अनावश्यक विचार नष्ट होतात आणि आवश्यक तेवढेच चित्तात उरते. जेव्हा आपण अनन्यभावाने नाम घेतो, तेव्हा बुद्धी स्थिर होते आणि मग संतांच्या प्रत्यक्ष सहवासाचा खरा आनंद घेता येतो.सत्संगतीमध्ये कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती शक्य होते. संतांच्या सानिध्यात भजन, पूजन, श्रवण आणि स्मरण या गोष्टी आपोआप घडत जातात. तिथे स्वतःच्या देहबुद्धीची विस्मृती होऊन केवळ नाम उरते. म्हणून, प्रारब्धावर अवलंबून न राहता प्रयत्नांनी संतांची संगत धरावी. संतांना जे प्रिय आहे (नामस्मरण), ते आपल्यालाही प्रिय वाटू लागणे, हाच त्यांचा खरा समागम किंवा सहवास होय. संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय.

# नृसिंहवाडीचा संततधार विधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे हा संततधार विधी चैत्र शुद्ध पंचमी ते द्वादशी असे आठ दिवस असतो. येथील यात्रेदरम्यान हा विधी संपन्न होतो. यावेळी नृसिंहवाडीचे पुजारी तीन पाळ्यांत आठ तास पवमानसूक्त, रुद्रावर्तने, पुरुषसूक्त, श्रीगुरुचरित्र पठण करीत असतात. त्यावेळी पुजारी भक्तांना पादुकांवरील पवित्र तीर्थ देतात. देवस्थानच्या संततधारेनंतर ज्या यजमानांना वैयक्तिक संततधार करायची असेल ते देवस्थानच्या परवानगीने करू शकतात. पूर्वी बरेच यजमान संततधार करीत होते पण वेळेच्या अभावामुळे आणि महर्गतेमुळे आता एखाद्दोनच होतात.

देवाच्या कट्ट्यावर मागील बाजूच्या ओवरीत एका मोठ्या परातीत अभिषेकासाठीच्या दत्तपादुका ठेवल्या जातात. एका मोठ्या अडणीवर अभिषेकपात्र ठेवले जाते. अत्यंत कडक सोवळ्यात आठ दिवस संततधार चालू असते. दहा ब्राह्मण सोवळ्याने नदीचे पाणी आणून हंडे भरत असतात. दोन ब्राह्मण समोरासमोर बसून सतत वेदपठण करीत असतात. पादुकांवरील जलाभिषेकाचे तीर्थ फार पवित्र असते आणि खरोखरच अकाल मृत्युहरण व सर्व व्याधींचा नाश करणारे असते अशी भाविकांची श्रद्धा आहे. ओवरी नारळाच्या झावळ्यांनी आणि विविध फुलांनी सजवलेली असते.

श्रीनृसिंह सरस्वती दत्त महाराजांची सुरेख तसबीर ठेवलेली असते. सातही दिवस श्रीगुरुचरित्र सप्ताह सुरू असतो. ब्राह्मणांना अल्पोपहार, भोजन सर्व दिले जाते. समाप्तीला १० ते १५ ब्राह्मण सामुदायिक पवमानसूक्त म्हणतात तेंव्हा अंगावर रोमांच येतात आणि डोळे प्रेमाश्रूंनी भरून येतात. मग सेवेकरी ब्राह्मणांना वस्त्र, दक्षिणा देऊन सन्मान केला जातो व मिष्टान्नभोजन देऊन समारोप होतो.

# विष्णू-लक्ष्मी मंदिराचा १८७ वा वर्धापनदिन साजरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पुण्यातील शनिवार पेठेतील वैभव असलेल्या आणि पेशवेकालीन वारसा लाभलेल्या श्री विष्णू-लक्ष्मी मंदिराचा १८७ वा वर्धापनदिन नुकताच अतिशय भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. अहिल्यादेवी शाळेजवळ, वीर मारुती चौकात असलेल्या या ऐतिहासिक मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या मंदिराला १८९ वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात विठ्ठल लक्ष्मण लिमये यांच्या पराक्रमावर खुश होऊन ही जागा त्यांना १८०७ मध्ये बहाल करण्यात आली होती. त्यानंतर, २२ मार्च १८३८ (फाल्गुन वद्य द्वितीया, शके १७६०) रोजी त्यांच्या पत्नी रखमाबाई लिमये यांनी या मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. लिमये यांचे नातेवाईक आणि विद्वान पंडित विष्णू बापट यांच्याकडे मंदिराची जबाबदारी सोपवण्यात आली होती.

मंदिरातील विष्णू आणि लक्ष्मीची मूर्ती संगमरवरी असून ती अत्यंत देखणी आहे. विष्णू मूर्तीचे खालचे हात कमरेवर आहेत, तर वरच्या उजव्या हातात शंख आणि डाव्या हातात चक्र आहे. विष्णू मूर्तीच्या शेजारीच लक्ष्मीची मूर्ती पद्मासनात विराजमान आहे. विशेष म्हणजे, मूळ लक्ष्मी मूर्ती भंगल्यामुळे नंतर नवीन मूर्तीची स्थापना करण्यात आली, जी मूळ मूर्तीपेक्षा आकाराने लहान आहे. या विष्णू-लक्ष्मी रूपाला 'बिजवर विष्णू' असेही संबोधले जाते. वर्धापनदिनानिमित्त मंदिरात विशेष सजावट करण्यात आली होती.

# दक्षिणेसी चला जाऊ, भावे गुलाल, दवणा वाहु आणि घेऊ जोतिबांचे दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दख्खनचा राजा श्री जोतिबा देवांच्या मंदिराबाहेर सर्रास नजरेस पडणारी ही वनस्पती , अनेक लोकांना या वनस्पती बद्दल कुतुहल असते ही वनस्पती म्हणजे काय ? तर या" दवणा" वनस्पती बद्दल जाणून घेऊया...

एक वेळ देवास फुलाचा हार नसला तरी चालेल पण चिमुटभर गुलाल आणि दवण्याच्या दोन काड्या देवास अर्पण केल्या की भक्ताला पुरेपूर समाधान"
या उक्तीप्रमाणे दख्खनचा राजा श्री जोतिबा यांच्या दर्शनात भाविक न चुकता पुजा साहीत्यामध्ये"





दवणा"ही वनस्पती घेतात आणि भक्तीभावाने राजाच्या चरणी अर्पण करतात.
दख्खनचा राजा श्री ज्योतिबा यांना वाहिली जाणारी दवना ही वनस्पती या वनस्पतीचे संस्कृत नाव " दमनक" असा आहे.. सरळ वाढणाऱ्या व शाखायुक्त वनस्पतीची लागवड वनस्पती उत्तर भारतात काश्मीर व दक्षिण भारतात महाराष्ट्र कर्नाटक या भागात होते. ही वनस्पतीची १५ ते ३० सें.उंची असते.दवण्याच्या खालच्या, मधल्या व वरच्या पानांच्या आकारात फरक असतो.या वनस्पतीचे शास्त्रीय नाव"आर्टेमिसिया पॅलेन्स" आहे. या वनस्पतीचे फुलोरे गोलसर, पिवळट हिरवे, लहान असतात ते मार्च-एप्रिलमध्ये येतात. दवण्याचे बी फार लहान, काळे व लांबट. असते दवणा तूरट, कडू, सुगंधी, ज्वरनाशक व कृमिनाशक असतो. सुगंधी पदार्थांत त्याचा उपयोग करतात. दवणा-तेल सुगंधी असून ते उच्च प्रतीच्या अत्तरात वापरतात. दवण्यापासून २२.५८% तेल निघते.
श्रीक्षेत्र जोतिबा डोंगर ला येणारा दवना हा डोंगराच्या उत्तर बाजूस असणाऱ्या केखले या गावांमध्ये या दवण्याची शेती केली जाते ,या भागातील वातावरण दवणा या वनस्पतीच्या लागवडीसाठी अनुकूल आहे.दवणा या वनस्पतीचे अनेक उपयोग आयुर्वेद शास्त्रात आहेत.उत्पादक शेतकरी दवण्याची लागवड अशी करतात, शेतात ओपे करून दवणा पिकाचे तरू टाकले जाते. शेत नांगरून मशागत केल्यानंतर सर्व शेतात ओपे केले जातात. त्यांना पाणी पाजून त्यावर ही उगवून आलेली दवणा रोपे लावली जातात. सुरुवातीला त्यांना दिवसाआड पाणी द्यावे लागते. महिनाभराने आठ दिवसांनी पाणी दिले जाते. तीन महिन्यांत दवणा पक्व होतो. त्याला फुले येतात व साऱ्या शिवारभर सुगंध पसरतो सहा महिन्यात हे पीक येते. सुरुवातीस ओला दवणा देवाला अर्पण केला जातो. मार्च व एप्रिल महिन्यात व पावसाळ्यात वाळलेल्या दवण्याची विक्री केली जाते. चार वनस्पतींची काडी करून पाच रुपये दराने विक्री केली, व २५ ते ३० रुपयाला पेंडी विक्रीस असते . एकदा शेतीमध्ये दवण्याचे पीक घेतल्यानंतर दुसरेवेळी त्या शेतीमध्ये दवना पीक काही वर्ष येत नाही.

### दवणा देवतांना का वाहिला जातो? ..

दवणा हा शीतलता देणारा उपचार आहे त्यामुळे देवतांना दवना अर्पण केला जातो..
दख्खनचा राजा श्री ज्योतिबा , श्री मार्तंड भैरव (खंडोबा, जेजुरी ) श्रीनाईकबा ( ढेबेवाडी) श्री शंभू महादेव ( शिखर शिंगणापूर ) श्री गणपती (मोरगाव) या देवतांना विशेष करून दवणा अर्पण केला जातो.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)